महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र
७०८, आरबी कुमठेकर मार्ग, सदाशिव पेठ, पुणे-४११०३०.
संपर्क क्रमांक (020)24478122 ईमेल : itdept@maa.ac.in

प्रति,

1. विभागीय उपसंचालक (सर्व)
2. उपसंचालक, प्रादेशिक विद्या प्राधिकरण (सर्व)
3. प्राचार्य, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था (सर्व)
4. प्रशासन अधिकारी, महानगरपालिका (सर्व)
5. प्रशासन अधिकारी, बृहन्मुंबई म.न.पा., मुंबई
6. शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक) (सर्व)
7. शिक्षण निरीक्षक, दक्षिण, उत्तर, पश्चिम मुंबई

**विषय : राज्यातील इयत्ता १ ली ते १२ वी पर्यंत अध्यापन करणाऱ्या सर्व शिक्षकांनी DIKSHA Portal वरील "AI Saathi for Educators" (शिक्षकांसाठी AI साथी) हा ऑनलाईन कोर्स पूर्ण करण्याबाबत.**

राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे यांनी कोटक एज्युकेशन फाउंडेशनच्या सहकार्याने **"AI Saathi for Educators" (शिक्षकांसाठी AI साथी)** हा ऑनलाईन कोर्स विकसित केला असून तो DIKSHA Portal वर उपलब्ध करून देण्यात आला आहे. सदर ऑनलाईन कोर्सचे उद्घाटन मा. शालेय शिक्षण मंत्री, श्री. दादाजी भुसे यांच्या शुभहस्ते दिनांक १४ जुलै २०२६ रोजी मंत्रालय, मुंबई येथे संपन्न झाले आहे.

कृत्रिम बुद्धिमत्ता (Artificial Intelligence - AI) हे तंत्रज्ञान आज शैक्षणिक तसेच प्रशासकीय व्यवस्थेचा अविभाज्य भाग बनत आहे. AI चा योग्य, सुरक्षित व जबाबदार वापर केल्यास अध्यापन-अध्ययन प्रक्रिया अधिक परिणामकारक होण्याबरोबरच दैनंदिन कामकाजाची गती, गुणवत्ता, अचूकता व कार्यक्षमता वाढण्यास मोठी मदत होते. अध्यापन नियोजन, अध्ययन साहित्य निर्मिती, मूल्यमापन, अहवाल लेखन, माहितीचे विश्लेषण, सादरीकरणे तयार करणे तसेच विविध प्रशासकीय कामांमध्ये AI आधारित साधनांचा प्रभावी वापर करता येतो. त्यामुळे शिक्षकांनी AI विषयक मूलभूत ज्ञान व कौशल्ये आत्मसात करणे ही काळाची गरज आहे.

सदर कोर्सद्वारे कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) व मशीन लर्निंग (Machine Learning) यांच्या मूलभूत संकल्पना, शिक्षण क्षेत्रामधील AI चे विविध उपयोग, AI आधारित उपयुक्त साधनांचा प्रभावी वापर, AI चा जबाबदार, सुरक्षित व नैतिक (Responsible AI) वापर तसेच दैनंदिन शैक्षणिक व प्रशासकीय कामकाजामध्ये AI चा प्रभावी समावेश करण्याच्या पद्धती यांविषयी मार्गदर्शन करण्यात आले आहे.

राष्ट्रीय शिक्षण धोरण (NEP) २०२० नुसार प्रत्येक शिक्षकाने दरवर्षी ५० तासांचे सतत व्यावसायिक विकास (Continuous Professional Development - CPD) प्रशिक्षण पूर्ण करणे अपेक्षित आहे. त्या अनुषंगाने सदर **"AI Saathi for Educators"** या ऑनलाईन कोर्ससाठी ४ तासांचे CPD प्रशिक्षण श्रेय (Weightage) निश्चित करण्यात आले आहे. त्यामुळे राज्यातील इयत्ता १ ली ते १२ वी पर्यंत अध्यापन करणाऱ्या सर्व शिक्षकांनी सदर कोर्स पूर्ण करणे आवश्यक आहे.

या कोर्ससाठी दिनांक ३१ ऑगस्ट २०२६ पर्यन्त प्रवेश घेता येणार असून कोर्स पूर्ण करण्याची अंतिम मुदत दिनांक ३० सप्टेंबर २०२६ आहे.

त्यामुळे आपल्या कार्यक्षेत्रातील सर्व शाळांना आवश्यक सूचना देऊन राज्यातील इयत्ता १ ली ते १२ वी पर्यंत अध्यापन करणाऱ्या सर्व शिक्षकांनी विहित कालावधीत कोर्समध्ये प्रवेश घेऊन अंतिम मुदतीपूर्वी कोर्स पूर्ण करतील, याबाबत आवश्यक कार्यवाही करावी.

**कोर्स सुरू करण्यापूर्वीची पूर्वतयारी**

**१. स्मार्टफोनवरून कोर्स पूर्ण करण्यासाठी**

**(अ) DIKSHA App डाउनलोड करणे:**

Google Play Store वरून **DIKSHA** App डाउनलोड करून त्यामध्ये नोंदणी करावी व संपूर्ण प्रोफाईल भरावी.

प्रोफाईल भरताना आपल्या पदनामाशी तंतोतंत जुळणारे पदनाम उपलब्ध नसल्यास त्यास सर्वाधिक जवळचे पदनाम निवडावे. तसेच संबंधित पदनाम उपलब्ध नसल्याची माहिती राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे यांच्या निदर्शनास आणून द्यावी, जेणेकरून पुढील अद्ययावतीकरणामध्ये आवश्यक पदनामांचा समावेश करता येईल.

**(आ) DIKSHA Courses App डाउनलोड करणे :**

प्रोफाईल पूर्ण झाल्यानंतर Google Play Store वरून **DIKSHA Courses** हे App डाउनलोड करावे.

त्यानंतर खालील लिंकवर क्लिक करून कोर्समध्ये प्रवेश (Enroll) घ्यावा.

**कोर्स लिंक :**

https://learning.diksha.gov.in/diksha/course.php?id=1252&section=2814&modeActive=8202

**२. Laptop / Desktop (Browser) द्वारे कोर्स पूर्ण करण्यासाठी**

Browser द्वारे कोर्स पूर्ण करू इच्छिणाऱ्या शिक्षकांनी **www.diksha.gov.in** या संकेतस्थळावर Login अथवा नोंदणी करावी.

DIKSHA App मध्ये यापूर्वीच त्याच ई-मेल आयडीद्वारे नोंदणी केलेली असल्यास त्याच Login द्वारे प्रवेश करता येईल. अशा वेळी पुन्हा प्रोफाईल भरण्याची आवश्यकता नाही. प्रथमच Login करत असल्यास आवश्यक ती प्रोफाईल माहिती पूर्ण भरावी.

Login केल्यानंतर मुख्य पृष्ठावरील **"DIKSHA Courses"** या Tab वर क्लिक करावे. त्यानंतर Search पर्यायामध्ये **"AI Saathi for Educators" (शिक्षकांसाठी AI साथी)** शोधून अथवा उपरोक्त लिंकवर क्लिक करून कोर्समध्ये प्रवेश (Enroll) घ्यावा.

कोर्स यशस्वीरित्या पूर्ण झाल्यानंतर प्राप्त होणारे प्रमाणपत्र डाउनलोड करून जतन करावे.

सदर बाबीस प्राधान्य देऊन आपल्या कार्यक्षेत्रातील सर्व शाळांमधील शिक्षकांकडून विहित कालावधीत सदर कोर्स पूर्ण करून घेण्याबाबत आवश्यक कार्यवाही करावी.

Digitally signed by
HEMANT VASEKAR
Date: 15-07-2026
18:21:40

**(डॉ. हेमंत वसेकर भा.प्र.से.)**
संचालक
राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र

**प्रत माहितीस्तव सविनय सादर :**
मा. प्रधान सचिव, शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय मुंबई.
मा. आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे.
**प्रतिलिपी :**

1. संचालक, प्राथमिक शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
2. संचालक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे.